# धुळे महानगरपालिका,धुळे

मा.आयुक्त तथा प्रशासक
नगरसचिव कार्यालय

---

## विशेष महासभा क्रमांक १ चे इतिवृत्त

---

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांकः-एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१/नवि१४ दि. २९/१२/२०२३ नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतूदीत अंतर्भुत केलेल्या कलम ४५२ अ (१अ) अन्वये मा.प्रशासक सो. यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार सर्वसाधारण महासभेसाठी प्राप्त झालेल्या प्रस्तावांवर निर्णय घेणेसाठी **गुरूवार दिनांक २५/०१/२०२४ सकाळी ११-०० वाजता स्व.अटलबिहारी वाजपेयी मुख्य सभागृहात आयुक्त तथा प्रशासक श्रीमती अमिता दगडे-पाटील यांच्या अध्यक्षतेखाली** संपन्न झाली. त्या सभेचे इतिवृत्त

सदर सभेस खालील अधिकारी उपस्थित होते.

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नाव | पदनाम |
|---|---|---|
| १. | श्रीमती अमिता दगडे-पाटील | आयुक्त तथा प्रशासक |
| २. | श्रीमती करूणा डहाळे | अति.आयुक्त |
| ३. | डॉ.संगीता नांदूरकर | उपायुक्त |
| ४. | श्री.गजानन पाटील | मुख्य लेखाधिकारी |
| ५. | श्री. सुनिलकुमार सुर्यवंशी | प्र. मुख्य लेखा परिक्षक |
| ६. | श्री.मनोज वाघ | नगरसचिव |
| ७. | श्री.नवनीत सोनवणे | कार्यकारी अभियंता पा.पू.वि. |
| ८. | श्रीमती पल्लवी शिरसाठ | मुल्य निर्धारण व कर संकलन अधिकारी |
| ९. | श्री.कैलास शिंदे | अभियंता |
| १०. | श्री. पी.डी. चव्हाण | सहाय्यक अभियंता |
| ११. | डॉ. एम.आर.शेख | आरोग्याधिकारी |
| १२. | श्री.राजेश वसावे | मुख्य स्वच्छता निरिक्षक |
| १३. | श्री. किशोर सुडके | परवाना विभाग / बाजार विभाग |
| १४. | श्री. एन. के. बागुल | विद्युत अभियंता |
| १५. | श्री.संजय मोरे | कार्यालयीन अधीक्षक |
| १६. | श्री.राजेंद्र माईनकर | प्र.भांडारपाल |
| १७. | श्रीमती कल्पना जाधव | अभिलेखापाल |
| १८. | श्री. प्रकाश सोनवणे | कनिष्ठ अभि. नगररचना विभाग |
| १९. | श्री.प्रसाद जाधव | अतिक्रमण विभागप्रमुख |
| २०. | श्री.राजेश गायकवाड | लेखापाल,शिक्षण मंडळ |
| २१. | श्री.चंद्रकांत जाधव | मलेरिया पर्यवेक्षक |
| २२. | श्री.विकास साळवे | स्वच्छता निरिक्षक |
| २३. | श्री.अतुल पाटील | लिडींग फायरमन |

| | |
|---|---|
| म.नगरसचिव | वंदे मातरम या राष्ट्रवंदनेसाठी सर्वांनी उभे रहावे. |
| **मा.प्रशासक:-** | आजच्या सभेचे कामकाजास सुरूवात करण्यात यावे. |
| विषय क्रमांक:-०१ | स्वच्छ महाराष्ट्र अभियान अंतर्गत धुळे शहरातील दररोज येणाऱ्या कचऱ्यावर प्रक्रिया करणेसाठी ई निविदा प्रक्रिया करणे व येणाऱ्या संभाव्य खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे. |
| म.नगरसचिव | नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले. |
| म. सहा. अभियंता | आरोग्य विभागाच्या अहवालानुसार धुळे शहरात साधारणत अंदाजे ११५ ते १२० टीपीडी कचरा गोळा केला जातो.आणि तो वरखेडी रोड वरील डम्पींग ग्राउंडवर डम्प करण्यात येतो. त्यावर कुठलीही प्रक्रीया न करतो तेथे डम्प केलेला आहे. त्याची विल्हेवाट लावणे आवश्यक आहे. त्यामुळे परिसरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात येऊ शकते. पावसाळयात यापेक्षाही भिषण परिस्थिती उत्पन्न होत असते. कचऱ्याच्या गाडया थेट पर्यंत जाण्यास अडचणी येत असतात.त्यासाठी घनकचरा अधिनियम २०१६ च्या तरतूदी नुसार व एनजीटी न्यायालयानुसार कचऱ्यावर प्रक्रीया करणे आवश्यक केले आहे. त्यानुसार आपण दररोज येणाऱ्या कचऱ्यावर प्रक्रीया करण्यासाठी आपण एक इस्टीमेट केले आहे. त्यात कचऱ्याचे विलगीकरण करायचे आहे. ओला कचरा , सुका कचरा आणि त्याप्रमाणे विल्हेवाट लावायची आहे. सुक्या कचऱ्यावर एमआरएफ सेंटरद्वारे प्रक्रीया करायची आहे. तसेच ओल्या कचऱ्यावर कंपोस्टींग, बायोगॅस या प्रक्रीयेतून तसेच इतर प्रक्रीयेद्वारे कचऱ्याची विल्हेवाट लावयची आहे. |
| म.आयुक्त | याचे कितीचे इस्टीमेट झाले आहे? आणि यात काय काय समाविष्ठ आहे? |
| म.सहा अभियंता | इस्टीमेट वार्षिक ४.७८ कोटी रुपयाचे झाले आहे. यात हेव्ही लेबर वर्कर २२ घेतले आहे, तसेच ८ फिमेल वर्कर घेतले आहे, २ मशिन ऑपरेटर आहे, २ सुपरवाईझर आहे, १ पोकलॅण्ड, १ जेसीबी असे त्यात समाविष्ठ आहे. यात मशिनरी असणार आहे. त्यासाठी ठेकेदारामार्फत योग्य त्या कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी अंदाजे रक्कम रुपये २ लाख महिना अंदाजपत्रकात गृहीत धरण्यात आले आहे. |
| म.आयुक्त | याचे टी एस करुन घेतले का? |
| म.सहा. अभियंता | याचे टीएस बाकी आहे. प्रशासकीय मंजूरीसाठी सादर केले आहे. प्रशासकीय मंजूरी नंतर टीएस करावे लागेल. |
| म.आयुक्त | यात २-३ गोष्टी आहे. तुमचे ऑनगोईंग कामे चालू आहे. बायोमाईनिंगचे काम संपत आले आहे. ती साईट त्याचे वेगळा डेव्हलपमेंट प्लॅन करायचा आहे आपल्याला. ऑक्सीडेशनची जागा , आता बायोगॅसचे काम चालू आहे तो एक पार्ट आणि त्याच्या पलीकडचा पार्ट जिथे आपले शेड बांधले आहे हे दोन वेगवेगळे विषय आहे. तर आता जे बायोमाईनिंग झाले ती जागा मोकळी झाली आहे त्या जागेची मोजणीची प्रोसेस करुन घ्यावी. आणि मुख्यमंत्री महोदयांचा महत्वकांक्षी प्रोजेक्ट आहे बांबू लागवडचा त्याचे प्रपोजल आपल्याला करायचे आहे. आणि जी रिक्लेम लॅण्ड आहे त्याचे लॅण्डस्केपिंग आणि बाकीच्या गोष्टी त्या सोबत करायच्या आहे. दुसरा कचऱ्याचा विषय आहे ठेकेदार कचरा उचलून डम्पींग ग्राउंडवर टाकून मोकळा होतो. या आधी तुम्ही प्रोसेसिंगचे टेंडर कधी केलेले नाही. बायोमाईनिंग केल्यावर सगळे संपते तुम्हाला दररोज येणाऱ्या कचऱ्यावर प्रोसेसींग केली पाहिजे. बायोगॅस प्रकल्प ३० टीपीडी क्षमतेचा तयार होत आहे. सोबत तुम्ही तिकडे जे शेड बांधले आहे. तेथे प्रोसेसिंगला स्कोप आहे. तेथे असलेली आधीची जुनी मशिनरी कुठे कामात येते का ते पाहून घ्या. आणि हे जे टेंडर करणार आहे ४ कोटी ७८ लाखाचे यामध्ये इक्झीस्टींग इन्फ्रास्ट्रकच्र काय काय |

वापरता येते बघा सेग्रीगेशनला वेगळी यंत्रणा लावावी लागेल. ही मॅनपॉवर पुरेल का याचा अंदाज घ्या. कचरा किती निघतो दररोज ?

म. सहा आरोग्याधिकारी अंदाजे साधारण ११५ ते १२० टीपीडी च्या आसपास.

म.प्रशासक मे.मिटकॉन कंपनीला एसबीएम २ अंतर्गत् डीपीआर करायचे काम देण्यात आले आहे. आता महिना भराने बायोगॅसचे काम संपेल तुमचे तुम्हाला ३० टन कचरा बायोगॅसला द्यायचा आहे. १०० टनातला ३० कमी झाल्यावर ७० टनामधला कंपोस्टींग करायचा किंती? सुका कचरा किती निघेल त्याचे अॅनॅलिसीस करा तुमच्याकडे डेटा असेलच. सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा महासभा प्रशासक ठराव क्रमांक ०१ दिनांक २५/०१/२०२४**

धुळे शहर हे ड वर्ग महानगरपालिका असून शहराचे क्षेत्रफळ सुमारे १०१.०८ चौ.किमी. आहे, तसेच सद्य स्थितीत शहराची लोकसंख्या ५ लक्ष येवढी आहे. सद्यस्थितीत आरोग्य विभागामार्फत शहरातील कचरा संकलनाचे काम खाजगी यात्राने मार्फत सुरु आहे. सद्यस्थितीत सुमारे १२५ ते १५० TPD येवढी कचऱ्याची आवक आहे. सदरील कचऱ्यावर प्रक्रिया होऊन विल्हेवाट लावली जात नसल्याने कचऱ्याचे ढीग तसेच पडून आहेत. तसेच त्या ठिकाणी कचरा टाकण्यासाठी जागाही उपलब्ध होत नसल्याने घंटागाडी वाले रस्त्यावर कचरा टाकून निघून जात असतात. त्यामुळे परिसरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. पावसाळ्यात यापेक्षाही भीषण परिस्थिती उत्पन्न होत असते. कचऱ्याच्या गाड्या थेट पर्यंत जाण्यास अडचणी येत असतात.

उक्त संदर्भात या पूर्वी मंजूर DPR मधीलSUPPLY, INSTALLATION & COMMISSIONING OF MUNICIPAL WASTE PROCESSING PLANT WITH MATERIAL RECOVERY FACILITY OF १५० to २०० TPD CAPACITY INCLUDING RUNNING PROJECT FOR ONE YEAR AT VARKHEDI ROAD DHULE, WITH MAINTANCE या कामासाठी रक्कम रु.४,७८,५०,०००/- साठी इकडील कार्यालयामार्फत ३ वेळा निविदा मागविण्यात आल्या होत्या, परंतु निविदेत पात्र उमेदवार प्राप्त झाले नसल्याने या बाबत प्रकल्पाची उभारणी होऊ न शकल्याने कचऱ्यावरील प्रक्रिया होऊ न शकल्याने कचरा पडून आहे. उक्त संदर्भात नव्याने SBM 2.0 मध्ये वरील कामासाठी MITCON कंपनी मार्फत DPR बनविलेला असून तांत्रिक मान्यतेसाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे सादर केला आहे. तंतिक मान्यते नंतर स्वच्छ महाराष्ट्र अभियान विभागास प्रस्ताव पाठून अंतिम मंजुरी नंतर ई-निविदा मागऊन पुढील आवश्यक कार्यवाही करण्यात येणार आहे. उक्त कामा संदर्भात मा.आयुक्त तथा प्रशासक यांनी दररोज येणाऱ्या कचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी तातडीने निविदा मागविणे बाबत आदेशित केले आहे.

त्यानुसार सदर कामाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून सदर कामास मजिप्रा विभागाकडील शासकीय दरसूची सन २०२२-२३ नुसार रु.४,०८,०२,४०१/- मात्र खर्च अपेक्षित असून सदरचा खर्च सन २०२४-२५ च्या मनपाच्या बजेटच्या एकून २५% निधी च्या आत सदरचा खर्च करण्यात येणार असून सदरच्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यतेस्तव शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उक्त अहवालानुसार स्वच्छ महाराष्ट्र अभियान अंतर्गत धुळे शहरातील दररोज येणाऱ्या कचऱ्यावर प्रक्रिया करणेसाठी ई निविदा प्रक्रिया करणे व येणाऱ्या संभाव्य खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. त्यानुसार सदर प्रस्तावास वाचा क्र.१ ते २

नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

तसेच शहराच्या घनकचरा व्यवस्थापन प्रभावीपणे राबविणेकरीता व शहरात निर्माण होणाऱ्या ओला कचरावर शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट लावण्यासाठी १० मॅट्रीक टन क्षमतेचे स्वयंचलित बायोकंपोस्टींग मशीन खरेदी करणे गरजेचे आहे. त्यासाठी सुमारे रू.२,२६,५५,०००/- (१२%जी.एस.टी.करासह) खर्च अपेक्षित आहे.याबाबत सदरकामी निधी उपलब्धतेसाठी जिल्हा नियोजन मंडळाकडेस प्रस्ताव सादर करणेस मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**(अमिता दगडे-पाटील)**
**मा.आयुक्त तथा प्रशासक**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-०२ — सन २०२३-२४ या आर्थिक वर्षासाठी महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान योजना अंतर्गत उपलब्ध होणाऱ्या नियतव्ययानुसार कामांची निश्चिती करण्यासाठी आलेल्या कार्यालयीन अहवालावर फेर निर्णय घेणे.

म.नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.अभियंता — याबाबत आपण यापूर्वीच्या सभेमध्ये दिनांक १२/०६/२०२३ रोजी ठराव क्र. २३९ याप्रमाणे कामांच्या निश्चीतीचा ठराव केला होता. त्यात २०२ कामे होती. त्या कामांची एकूण ५३ कोटी ४९ लाखाच्या कामांचा समावेश होता. पण या कामांमध्ये मा. पालकमंत्र्यांची कामे घेण्यात आली नव्हती. त्यानंतर मा. जिल्हाधिकारी कार्यालया मार्फत मा. पालकमंत्र्याची २०% कामे प्राधान्याने घ्यावी असे त्यांनी लिस्ट करुन दिले आणि समक्ष बोलवून ही सांगीतले आहे. सदरची बाब आपण तत्कालीन महापौर यांच्या निर्दशनास आणून दिली. त्यानंतर मा. महापौरांनी सदरची कामे यादीत समाविष्ठ करुन दिनांक १९/१२/२०२३ रोजी मा. जिल्हाधिकाऱ्यांना पत्र दिले. तथापि जिल्हाधिकाऱ्यांनी यात सुध्दा आपले जे मंजूर नियतव्यय आहे ३२ कोटीचे आपले दायीत्व वजा जाता दीडपट ३२ कोटी प्रमाणे प्रशासकीय मान्यतेची कामे आपण सूचवू शकतो. त्यामुळे मा. जिल्हाधिकाऱ्यांनी डीपीडीसी च्या बैठकीत ३२ कोटीची कामे निश्चीत करुन द्यावी व पालकमंत्र्यांची कामे प्राधान्याने घ्यावी असे सूचीत केले. त्यामुळे सदरचा विषय पुन्हा महासभेपुढे ठेवला आहे.

म.प्रशासक — आता कसा क्रम लावला आहे? कशी प्रोसेस करत आहात? आधीची यादी समोर ठेऊन कामे घ्यावी यादीत फेरफार करु नये. थोडक्यात आपल्याला लिस्ट रिअरेंज करुन द्यायची आहे.

म.अभियंता — जी अनुज्ञेय नाही व दुबार कामे आपण यात घेणार नाही. यामध्ये प्रथमत: मा. पालकमंत्र्यांची कामे नंतर पदाधिकाऱ्यांची कामे, आणि नगरसेवकांची कामे घेणार आहोत. असे एकूण ३२ कोटी पर्यंत कामांची लिस्ट द्यायची आहे. कोणाचे काम वगळायचे किंवा नविन काम ॲड करायचे असे काही करायचे नाही. मा. पालकमंत्रयांनी परवा एक पत्र दिले ३० लाखाच्या कामाचे फक्त ते काम ॲड करणार आहोत. प्रस्ताव मान्यतेबाबत शिफारस आहे.

म. प्रशासक — हे करतांना हे पण पहावे की प्रायव्हेट जागेवर काम सजेस्ट केले आहे का, सुवर्ण जयंती नगरोत्थान, दलीतेतर यांच्यात अनुज्ञेय नसलेले काम आहे का तसेच सरसकट बागेमध्ये सजेस्ट केलेले काम म्हणजे पेव्हर ब्लॉक बसविणे किंवा अजून जिथे बागेमध्ये बाग काम करायचे तेथे प्लांटेशनला प्राधान्य द्यावे. सिमेंटची जंगल करायची गरज नाही. अशी कामे यामध्ये लिस्ट करायची ५३ कोटीच्या आधीचा ठराव होता. ३२ कोटी पर्यंतचा आऊट ले या वर्षीचा ३२ कोटी पर्यंतच्या कामे प्राधान्याने सांगीतली तशी प्राधान्याने कामे जाऊ द्या. आणि

समजा कुठे कुणाच्या बाबतीत राहत असेल महत्वाचे काम आहे हे यात व्हायला पाहिजे तर हे प्रशासकीय मान्यतेला पाठवून दिल्यानंतर मा. पालकमंत्री महोदयांच्या कानावर घालून तसे पत्र पाठवू. जास्तीचे पैसे मागायला स्कोप ठेऊ. आता जे राहिले ते कुठल्याही परिस्थितीत आजच ठराव करुन सोमवारी प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी महोदयांकडे गेले पाहिजे. जास्त उशिर होणार नाही याची दक्षता घ्या. आऊट लेट मध्ये बसणारे कामांची लिस्ट पाठवावी. सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा महासभा प्रशासक ठराव क्रमांक ०२ दिनांक २५/०१/२०२४**

शासन निर्णयात नमूद निकषानुसार सन २०२३-२४ या आर्थिक वर्षासाठी महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान योजनासाठी १ ते २०२ कामांची निश्चिती करून ठराव पारित करण्यात आलेला होता.त्यानुसार धुळे महानगरपालिका पत्र क्र./धुमपा/बां.वि./२१७/ दि.०७/१२/२०२३ अन्वये २०२ कामांचा एकूण रु.५३,४९,००,०००/- मात्र रकमेचा प्रस्ताव म.जिल्हाधिकारी यांचेकडे सादर केलेला आहे. त्यात प्राधान्य क्रमाने कामे घेणेबाबत निश्चिती नमूद आहे.

उक्तकामी रु.५३.४९ कोटी मात्र रकमेचा प्रस्ताव सादर केला असला तरी दीड पट रक्कमेसह मंजूर नियतव्यय नुसार रक्कम रु.३२ कोटी मात्र रक्कमेपर्यंत प्रशासकीय मान्यता मिळण्यास वाव आहे. यामध्ये मा.पालकमंत्री महोदय यांच्या राखीव निधीची कामे तसेच मा.खासदार यांनी पत्रान्वये दिलेली कामे प्राधान्याने घेणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे दि.२०/०१/२०२४ रोजी जिल्हा नियोजन आढावा बैठकीत मा.जिल्हाधिकारी यांनी म.प्रशासक म्हणून आपण रु.३२ कोटी मात्र रक्कमेची कामांची निश्चिती करून द्यावी असे निर्देश दिले आहे. त्यानुसार शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे. त्यानुसार सदर प्रस्तावास वाचा क्र.१ ते २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

उक्त अहवालानुसार धुळे महानगरपालिका क्षेत्रात जिल्हा स्तरीय नगरोत्थान योजने अंतर्गत सन २०२३-२४ या आर्थिक वर्षासाठी खालील कामे निश्चित करून कामे प्रस्तावित करणेस व यासाठी मनपा आवश्यक तो हिस्सा अदा करणेस मान्यता देण्यात येत आहे. तात्काळ प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी धुळे यांचेकडेस सादर करावा.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | धुळे मनपा क्षेत्रामध्ये मुख्य चौकात, उद्यान, अमरधाम, तसेच मुख्य मार्गावर सोलार हायमास्ट बसविणे | ५०००००० |
| २ | अग्रवाल नगर श्री. गणेश अपार्टमेंट जवळनाल्यावर पुलमोरी व आवश्यक बांधकाम करणे. | ६०००००० |
| ३ | प्रभाग क्र.०२ पांडव नगर भूजल कॉलनी जिल्हा परिषद कॉलनी य नगावचा परिसर रस्ते व गटार करणे. | १७५००००० |
| ४ | प्रभाग क्र.१५ मध्ये विद्याविहार कॉलनीत अहिरराव ते चव्हाण रस्ता कॉंक्रीट करणे | २५००००० |
| ५ | प्रभाग क्र.१८ समता नगर भागात व अवटे यांच्या घराजवळ रस्ता कॉंक्रिट करणे | २५००००० |
| ६ | नकाणे रोड नंदनवन हाऊसिंग सोसायटी राणी ब्युटीपार्लर ते शिवदास मराठे पर्यंत रस्ता व गटार कॉंक्रीट करणे. | ३०००००० |
| ७ | प्रभाग २ नागावबारी परिसर येथे लाईटपोल व हायमॅक्स बसवणे. | २५००००० |
| ८ | डोंगरे महाराज नगरमध्ये ड्रेनेजलाईन टाकणे. | २५००००० |

| | | |
|---|---|---|
| ९ | प्रभाग क्र.५ मधील संतकृपा संकुल ते इंद्रप्रस्थ कॉलनी बोर्ड पावेतो (श्री.पाटील यांच्या घरापावेतो) रस्ता डांबरीकरण करणे. | ४०००००० |
| १० | प्रभाग क्र. १४ गोपाल शर्मा गुरुजी ते राजू अप्पा गवळी ते बनशीलाल छोरीया ते गोपाल शर्मा रस्ता करणे. | ४०००००० |
| ११ | प्र.क्र.5 मध्ये भरत नगर व ओम नगर मध्ये रस्ता कॉंक्रीट करणे. | ३२००००० |
| १२ | अँड. एस. एन. पाटील (बेहेरे) ते तुळशिराम नगर रिक्षा स्टॉप जवळ चैतन्य मेडिकलपर्यंत रस्ता काँक्रीटीकरण करणे. | २५००००० |
| १३ | गुलमोहर हाऊसिंग सोसायटी अंतर्गत व नवनाथ महाराज मंदिरासमोरील रस्ता कॉंक्रीटीकरण करणे | ३५००००० |
| १४ | श्री.संस्कार मतिमंद मुलांचे वस्तीगृह बालाजी नगर साक्री रोड येथे पिण्याची पाईपलाईन टाकणे. | ५०००००० |
| १५ | प.क्र.1 वलवाडी शिवार इंद्रप्रस्थ कॉलनी मधील श्री.चेतन पाटील भाऊसाहेब यांच्या घरापासून ते सुशी नाला पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | २९८०९४९ |
| १६ | प्रभाग क्र. १ रामराव दादा सोसायटी ते साळुंखे सराच्या घरापर्यंत अंतर्गत रस्ते तयार करणे. | ४०००००० |
| १७ | प्रभाग क्र.१३ मध्ये जयशंकर कॉलनी चाळीसगांव रोड मध्ये सर्व्हे नं.३७३/७९ब/२ येथील मोकळ्या जागेत सभागृह बांधणे. | ४०००००० |
| १८ | प्रभागक्र. १ पाटबंधारे कॉलनीचा बोर्ड ते सितामाई शाळा ते नकाणे रोड रस्ता डांबरीकरण करणे. | ४०००००० |
| १९ | चाळीसगांव रोड नाल्यास रिटेनिंग वॉल व गेट तयार करणे. | २००००००० |
| २० | स्नेह नगर भागात अंतर्गत रस्ते काँक्रीटीकरण करणे व बंदिस्त गटार करणे. | १००००००० |
| २१ | काळुबाई मंदिरासमोरील परिसरात काँक्रीट रस्ता व गटार करणे. | १०००००० |
| २२ | शारदा नेत्रालय ते डॉ. यतिन वाघ यांच्या घरापर्यंत रस्ता काँक्रीटीकरण करणे. | २०००००० |
| २३ | प्रताप नाना महाले ते मंदार आरकाडे सोसायटी पावेतो रस्ता कॉंक्रीट करणे. | २५००००० |
| २४ | प्रभाग क्र.०५ मधील राम नगर येथे किशन चौधरी यांच्या घरापासून ते शिवराय नगर मधील श्री.मगरे यांच्या घरापासून ते वाडीले पर्यंत रस्ता काँक्रीट करणे | २५००००० |
| २५ | प्रभाग क्र.०५ मध्ये राम नगर मधील श्री. भट यांच्या घरापासून ते अमेय अपार्टमेंट पर्यंत रस्ता काँक्रीटीकरण करणे. | २५००००० |
| २६ | श्री.एस.डी.पवार सर यांच्या घर ते किरण देशमुख ते चंद्रशेखर विभांडिक व किरण देशमुख, महेंद्र जैन यांच्या घराजवळील नाल्यापावेतो बंदीस्त गटार करणे. | १५००००० |
| २७ | पितांबर नगर येथे अंतर्गत रस्ते काँक्रीटीकरण करणे. | २५००००० |
| २८ | धुळे मनपा हद्दीतील माधवपुरा येथे बंदिस्त गटार व काँक्रीट रस्ता करणे. | २५००००० |
| २९ | आराधना रसवंती ते सगुना चिकन पावेतो रस्ता काँक्रीट करणे. | २५००००० |
| ३० | स्वामी विवेकानंद कॉलनी येथे जे. बी. पाटील ते बापू चौधरी यांच्या घरापर्यंत सिमेंट काँक्रीट रस्ता तयार करणे. | २५००००० |
| ३१ | पासी यांच्या घरापासून ते दाता सरकार मंगल कार्यालयपर्यंत सिमेंट नाली बनवणे. | २५००००० |
| ३२ | प्रभाग क्र.१६ मध्ये श्री. प्रभाकर बाविस्कर यांच्या घरापासून ते पंडित पवार आणि त्र्यंबक देसले यांचे घर ते मनोज अग्रवाल यांच्या घरापावेतो रस्ता काँक्रीटीकरण करणे. | २५००००० |

| | | |
|---|---|---|
| ३३ | प्रभाग क्र.११ मध्ये लक्ष्मी नगर येथे रेखाबाई थोरात यांच्या घरापासून ते राम कानडे यांच्या घरापर्यंत कॉंक्रीट गटार करणे. | २५०००००० |
| ३४ | प्र.क्र. १७ मधील सुदर्शन कॉलनी येथे प्लॉट नं.२३,२४ नाना गवळी यांच्या घराजवळील परिसरात रस्ता कॉंक्रीट व बंदिस्त गटार करणे. | २५०००००० |
| ३५ | प्रभाग क्र.१३ दिलदार नगर व जय शंकर कॉलनी भागात रस्ता कॉंक्रीट करणे. | २५०००००० |
| ३६ | प्रभाग क्र.१३ भंगार बाजार व कलाम खान यांच्या दूकानापासून ते फारुख शेठ यांच्या दुकाना पावेतो रस्ता कॉंक्रीट करणे. | २५०००००० |
| ३७ | प्र.क्र.३ विटाभट्टी येथील संजय येवले ते छोटू पाटील यांच्या घराजवळील परिसरात रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. | २५०००००० |
| ३८ | देवपूर वलवाडी राम नगर सेक्टर नं.२ (भिवसन नगर) रनाळकर टेलर्स च्या घरापासून डी.डी.सी बँक कॉलनीच्या बोर्ड पर्यंत रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. | २५०००००० |
| ३९ | शांती निकेतन ते सुशी नाला पावेतो बंदिस्त गटार करणे. | १०००००० |
| ४० | प्र.क्र.०२ मध्ये किसन ठाकरे ते पवन मोरे यांच्या घरापर्यंत रस्ता कॉंक्रीट करणे. | ३०००००० |
| ४१ | प्रभाग क्र.०३ मधील विटाभट्टी भागातील सार्व. शौचालय जवळ गटार करणे. | १०००००० |
| ४२ | अलंकार सोसायटी मधील ओपनस्पेस मध्ये उद्यान विकसित करणे. | २५०००००० |
| ४३ | प्रभाग क्र 1 इंद्रप्रस्थ कॉलनी ते दुबे सर ते उत्तरेकडील सुशीनाला पर्यंत बंदिस्त पाईप गटार करणे. | १०००००० |
| ४४ | प्रभाग क्रमांक 1 बिजली नगर येथे बंदिस्त गटार करणे. | १०००००० |
| ४५ | मौजे वलवाडी प्र. क्र. 1 येथील आदिवासी स्मशानभूमीला जोडणारा रस्ता कॉंक्रिट करणे. | १०००००० |
| ४६ | मौजे वलवाडीप्र. क्र. 1 येथील आदिवासी वस्ती गटार व रस्ता कॉंक्रिट करणे. | १०००००० |
| ४७ | प्रभाग क्र.1 मधील भोकर गावातील चावरा हायस्कूल कडे जाणाऱ्या रस्त्यावरील सुशीनाल्यावर पाईपमोरी बांधणे. | २०००००० |
| ४८ | प्रभाग क्र.2 मधील जय मल्हार नगर अंतर्गत रस्ते कॉंक्रिटीकरण करणे | २०००००० |
| ४९ | प्रभागक्र.02अजय नगर मध्ये मेघश्याम पाटील ते पोस्ट ऑफिस पावेतो रस्ता कॉंक्रीट करणे. | २०००००० |
| ५० | प्रभाग क्र.2 मधील संतसेना नगर एकविरा वेल्डिंग वर्क्स पासून ते अनिल महाले यांच्या घरापर्यंत रस्ता कॉंक्रिट करणे. | २०००००० |
| ५१ | प्रभाग क्र. 2 मधील हजारे कॉलनी व श्रीकृष्ण कॉलनी अंतर्गत रस्ते डांबरीकरण करणे. | २०००००० |
| ५२ | प्रभाग क्रमांक 3 मधील टेलिफोन कॉलनी भागात श्री निकुंभ ते श्री मोरे साहेब ते श्री खोंडे यांच्या घरा पर्यंत रस्ता डांबरी करण करणे. | २०००००० |
| ५३ | प्रभाग क्रमांक 3 मध्ये जाकिर अहमद व अख्तर अहमद यांच्या घरासमोरील परिसरात व विविध ठिकाणी रस्ता कॉंक्रीटकरणे. | २०००००० |
| ५४ | प्रभाग क्र. 3 मधील विटाभट्टी गुलाब हाजी नगर दाता मेडिकल ते मजूर ठेकेदार (दाळवाले हॉस्टेल) यांच्या घरापर्यंत रस्ता कॉंक्रिट करणे. | २०००००० |
| ५५ | प्रभाग क्र. 3 विटाभट्टी भागातील सर्व्हे नं.30/2 गट 32 व लाला सरदार नगर भागात रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. | २०००००० |
| ५६ | प्र.क्र. 4 मध्ये गीता नगर भागात नितीन देवरे यांचे घर ते ऋषिकेश पाटील यांच्या | २०००००० |

| | | |
|---|---|---|
| | घरापर्यंत रस्ता कॉंक्रिटीकरण करणे. | |
| ५७ | प्र.क्र. 4 नेहरूनगर श्याम भाई चौधरी ते कुलकर्णी यांच्या घरापर्यंत रस्ता कॉंक्रिटीकरण करणे. | २०००००० |
| ५८ | प्र.क्र. 4 नेहरूनगर शांती निकेतन जवळ श्याम खंडेलवाल ते सिसोदिया निवास रस्ता कॉंक्रिटीकरण करणे. | २०००००० |
| ५९ | प्रभाग क्र.04 प्रोफेसर कॉलनी मधील उद्यानास सुशोभिकरण,  करणे. | २०००००० |
| ६० | प्र.क्र. 5 शिवराय नगर भागात अंतर्गत रस्ते कॉंक्रिटीकरण करणे. | २०००००० |
| ६१ | प्र.क्र. 5 मधील अनमोल नगर येथील सि.स.नं.75/4 मधील ओपनस्पेस मध्ये उद्यान विकसित करणे | २०००००० |
| ६२ | प्र.क्र.5 शिव प्रताप कॉलनी अंतर्गत रस्ते कॉंक्रीटीकरण करणे. | २०००००० |
| ६३ | प्र.क्र.5 मध्ये आदर्श कॉलनी भागात ॲड. पाटील यांच्या घरापासून ते श्री मोराणकर यांच्या घरापर्यंत बंदिस्त गटार करणे. | १५००००० |
| ६४ | प्र.क्र. 6 मध्ये गुरु गणेश नगर डी.आर. नगर व समृध्दी नगर येथे पाईप गटार करणे व हिराजी नगर येथे कॉंक्रीट गटार करणे. | २०००००० |
| ६५ | सुनील दगा यांच्या घरापासून ते साखराम मोरे यांच्या घरांपावेतो रस्ता कॉंक्रीटकरण करणे. | २०००००० |
| ६६ | प्र.क्र. 6 मधील एकलव्य पुतळा ते नदि पर्यंत गटार बनविणे. | १०००००० |
| ६७ | प्रभाग क्र.6 प्रभाकर बापू लोंढे यांच्या घरापासून ते बुधा नागमल यांच्या घरापर्यंत कॉंक्रीट रस्ता करणे. | १०००००० |
| ६८ | प्र.क्र.७ मध्ये लक्ष्मी नगर येथील बंटी यांच्या घरापासून ते गवळी यांच्या घरापावेतो गटार करणे. | २०००००० |
| ६९ | प्र.क्र.7 मध्ये पाडवी सोसायटी जगदीश तनेजा ते पंकज कटारिया यांच्या घरापावेतो रस्ता कॉंक्रीट करणे. | २०००००० |
| ७० | प्र.क्र.7 मध्ये पंकज कटारिया ते कैलास पोपली यांच्या घरापावेतो रस्ता कॉंक्रीट करणे. | २०००००० |
| ७१ | महेश मेवाणी ते आकाश चावला गटार करणे ते संजय राजांनी ते कुकरेजा घरापावेतो रस्ता कॉक्रीटीकरण करणे. | २०००००० |
| ७२ | प्रभाग क्र.08 मध्ये भिस्ती गल्ली सुभान धोबी ते पप्पु रिक्षावाले यांचे घरापर्यंत रस्ता कॉंक्रीट करणे. | २०००००० |
| ७३ | प्रभाग क्र.08 मध्ये कसाबवाडा व मच्छी बाजार येथे उमर अन्सारी ते आरिफ अन्सारी, शमशुद्दीन मास्टर ते नवाब मास्टर ते सबाब अन्सारी ते अन्वर अन्सारी रस्ता कॉंक्रीट करणे | २०००००० |
| ७४ | प्रभाग क्र.08 श्री.रघुनाथ वायरमन यांच्या घरापासून ते आझाद सायकल मार्ट पर्यंत रस्ता कॉंक्रीट करणे. | २०००००० |
| ७५ | प्रभाग क्र.09 मध्ये डबीपुरा रवी काकड घर ते अनिल गायकवाड यांच्या घरापावेतो बंदिस्त गटार करणे. | २०००००० |
| ७६ | प्रभाग क्र.09 मध्ये शरद पाटील सर यांचे घरापासून ते धना कोळी भोई गल्ली चौकापावेतो पाईप गटार करणे. | २०००००० |
| ७७ | फुले कॉलनी भागातील विजय पाच्छापूरकर घराजवळील रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. | २०००००० |

| | | |
|---|---|---|
| ७८ | प्रभाग क्र.10 मध्ये गल्ली नं.14 ये्थील श्री.दिलीप दंगल माळी यांच्या घरापासून ते श्री. सुकलाल फुलपगारे यांचे घरापर्यंत रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. | २०००००० |
| ७९ | प्रभाग क्र.10 वैधवाडा येथे रस्ता कॉंक्रीट करणे व पाईपलाईन टाकणे. | २०००००० |
| ८० | प्रभाग क्र.10 साईग्राम नगर कालिंदी अपार्टमेंट ते श्री.सोनार ते श्री. दिलीप जयराम पाटील ते श्री.सुनिल पालस्कर यांचे घरापर्यंत रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. | २०००००० |
| ८१ | प्रभाग क्र.10 मध्ये सोनाई नगर बर्फ कारखाना मागे शामराव चौधरी ते दक्षिणेस रमेश उत्तम चौधरी चंडीका चक्की पावेतो रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. | २०००००० |
| ८२ | प्रभाग क्र.11 बाळापूर येथे विविध भागात रस्ते कॉंक्रीटीकरण करणे. | २०००००० |
| ८३ | प्रभाग क्र.11 शांतीनगर मयुर सूर्यवंशी यांच्या घरापासून ते किसन चौधरी यांच्या घरापर्यंत रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. | २०००००० |
| ८४ | प्रभाग क्र.11 स्वामी विवेकानंद सोसा. जे.बी.पाटील यांच्या घरापासून ते संताजी नगर कोपऱ्यापर्यंत रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. | २०००००० |
| ८५ | प्रभाग क्र.11 लक्ष्मीनगर येथे बन्सीलाल चौधरी यांच्या घरापासून ते पिंटू यांच्या घरापर्यंत रस्ता कॉंक्रीट करणे. | २०००००० |
| ८६ | प्रभाग क्रमांक 12 मध्ये अंबिका नगर येथे कॉंक्रीट गटार करणे | २०००००० |
| ८७ | प्रभाग क्रमांक 12 मध्ये आझाद नगर व मुस्लिम नगर भागात रस्ता कॉंक्रिटीकरण करणे | २०००००० |
| ८८ | प्रभाग क्रमांक 12 मध्ये मिल्लत नगर हजार खोली येथे जावेद हाजी यांच्या घरापासून ते यासीन भाई यांच्या घरापर्यंत रस्ता कॉंक्रिटीकरण करणे | २०००००० |
| ८९ | प्रभाग क्रमांक 12 मध्ये अत्तर भाई यांच्या घरापासून ते कुर्बान ड्रायव्हर यांच्या घरापर्यंत रस्ता कॉंक्रिटीकरण करणे. | २०००००० |
| ९० | प्रभाग क्रमांक 13 मध्ये मौलवी गंज येथे अजगर अली मिठाईवाले यांच्या घरापासून ते सलमान हाफिज यांच्या घरापर्यंत रस्ता कॉंक्रीट व पाईपलाईन टाकणे. | २०००००० |
| ९१ | प्रभाग क्र.13 मध्ये काझी प्लॉट भागात कॉंक्रीट रस्ता व गटर करणे. | १०००००० |
| ९२ | प्रभाग क्रमांक 13 मध्ये मौलवीगंज येथे डॉक्टर अबूतरा यांच्या हॉस्पिटल मागे रस्ता कॉंक्रीट व गटार करणे | १०००००० |
| ९३ | प्र.क्र.13 मध्ये दिलदार नगर, रातराणी हॉटेल, जयशंकर कॉलनी व विविध भागात कॉंक्रीट रस्ता करणे. | २०००००० |
| ९४ | प्रभाग क्र.14 मध्ये अग्रवाल नगर येथे श्री.गुजराती यांचे घर ते श्री.अग्रवाल यांच्या घरापावेतो रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. | २०००००० |
| ९५ | प्र.क्र.14 मध्ये अंतर्गत रस्ते व गटारी करणे. | २०००००० |
| ९६ | प्रभाग क्र.14 मध्ये चंपा बाग भागात रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. | २०००००० |
| ९७ | प्रभाग क्र.15 मध्ये महेंद्र प्रोव्हिजन ते थोरात यांच्या घरापर्यंत रस्ता कॉंक्रीट करणे. | २०००००० |
| ९८ | अशोक भावनानी ते केंब्रीज स्कुल पावेतो रस्ता कॉंक्रीट करणे. | २०००००० |
| ९९ | प्र.क्र. 15 मधील नवसारे ते विठ्ठल मंदिर पावेतो रस्ता कॉंक्रीट करणे | २०००००० |
| १०० | धुळे मनपा हद्दीतील अशोक नगर येथे रस्ता कॉंक्रीट करणे. | २०००००० |
| १०१ | प्रभाग क्र.16 मध्ये मोतीलाल थोरात यांच्या घरापासून ते देविदास गंगाराम घरापावेतो रस्ता कॉंक्रीट करणे. | २०००००० |
| १०२ | पी.डी. मिस्त्री नगर रासिर रोड ते बाळू मिस्त्री यांच्या घरापावेतो रस्ता कॉंक्रीट करणे. | २०००००० |

| | | |
|---|---|---|
| १०३ | प्र.क्र. 16 मधील अयोध्या नगरी मधील खैरनार ते परदेशी यांच्या घरापर्यंत रस्ता कॉंक्रीट करणे. | २०००००० |
| १०४ | चितोड मधील रमेश नगर ते बाळू जाधव यांच्या घरापावेतो पाईप लाईन टाकणे व साने गुरुजी येथे बंदिस्त आर.सी.सी. पाईप गटार करणे. | २०००००० |
| १०५ | प्र.क्र. 17 मधील श्री महाले यांच्या घरापासून ते श्री चौधरी ते तुळजा भवानी मंदिरा पावेतो बंदिस्त गटार करणे व दीपलक्ष्मी नगर मध्ये श्री.चौधरी यांच्या घरापासून ते श्री.वाघ यांच्या घरापर्यंत रस्ता कॉंक्रीट करणे | २०००००० |
| १०६ | प्र.क्र.17 मधील साईदर्शन कॉलनी भागात अंतर्गत गटार करणे. | २०००००० |
| १०७ | प्र.क्र.17 मधील  रासकर नगर व गुरुकृपा नगर येथे रस्ता कॉंक्रीट करणे | २०००००० |
| १०८ | प्र.क्र. 18 यशवंत आप्पा रवंदळे  ते मच्छिंद्र पाटील  यांच्या घरापर्यंत रस्ता कॉंक्रीट करणे | २०००००० |
| १०९ | प्र.क्र. 18 मधील मच्छिंद्र भाऊ मंडपवाले बोरसे बाई यांच्या घरापर्यंत रस्ता  कॉंक्रीट करणे | २०००००० |
| ११० | प्र.क्र. 18 दीडशे खोल्या ते बोरसे बाई यांच्या घराचा रस्ता कॉंक्रीट करणे | २०००००० |
| १११ | प्रभाग क्र.18 तुळजा भवानी मंदिर परिसरात कॉंक्रीटीकरण करणे. | २०००००० |
| ११२ | प्रभाग क्रमांक 19 मध्ये 40 गांव रोड येथे समीर पिंजारी ते सईद यांच्या घरापर्यंत रस्ता कॉंक्रीट करणे. | २०००००० |
| ११३ | प्रभाग क्र 19 मध्ये हुडको कॉलनी मध्ये 100 फुटी रोड येथे अख्तर टेम्पो वाले यांच्या घरापासून शिफा क्लिनिक पर्यंत रस्ता कॉंक्रीट करणे | २०००००० |
| ११४ | प्रभाग क्र 19 मध्ये बिलाल मस्जिद पासून ते अत्तरउल्लाह साबून वाले यांच्या घरापर्यंत रस्ता कॉंक्रिट करणे. | २०००००० |
| ११५ | प्रभाग क्र 19 मध्ये बोरसे कॉलनी जवळ मुस्तफा मस्जिद पासून समद अब्दुल हमीद यांच्या घरापर्यंत रास्ता कॉंक्रीट करणे. | २०००००० |
| ११६ | प्रभाग क्र.19 मध्ये आयशा मश्जिद ते अजमेरा नगर पावेतो बंदिस्त गटार करणे. | २०००००० |
| ११७ | संभाप्पा कॉलनी मोगलाई'कर कॉम्प्लेक्स पासून शर्मा नगर पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | २०००००० |
| ११८ | स्नेहनगर भागात डॉ. घोगरे यांच्या घरापासून ते परद सर यांच्या घरपर्यंत रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. | २०००००० |
| ११९ | प्र.क्र.१० मध्ये बडगुजर प्लॉट येथील श्री.गुरूदेव दत्तमंदिर समोर पत्र्याचे सभागृह बांधणे. | ५०००००० |
| १२० | प्र.क्र.१० मध्ये दिलीप पाटील यांच्या घरापासून ते श्री.संदिप पाटील यांच्या घरापावेतो रस्ता कॉंक्रीट करणे. | २५००००० |
| १२१ | प्र.क्र.७ मध्ये अडावते ते शिंदे व सोनवणे ते ललित पाटील यांच्या घरापावेतो रस्ता कॉंक्रीट करणे. | २५००००० |
| १२२ | सचिन मराठे यांच्या घरापासून ते श्री.चौधरी यांच्या घरापर्यंत रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. | ६०००००० |
| १२३ | प्र.क्र.२ मध्ये भगवती नगरमध्ये अंतर्गत रस्ते कॉंक्रीटीकरण करणे. | ३०००००० |
| १२४ | प्रभाग क्र.०९ मध्ये गुरव गल्ली श्री. एकविरा देवी मागील भागात श्री. मारुती मंदिर ते श्री. एकविरा देवी मंदिरापर्यंत गटार करणे. | २०००००० |

| | | |
|---|---|---|
| १२५ | प्र.क्र.१० मध्ये ग्रामपंचायत कार्यालय ते श्रीराम चौधरी यांच्या घरापावेतो रस्ता कॉक्रीट करणे. | २०००००० |
| १२६ | प्रभाग क्र.०७ दशक्रिया विधीसाठी शेड बांधणे. | १५००००० |
| १२७ | साळुंखे यांच्या घरापासून ते सुर्यवंशी व निकम ते भावसार यांच्या घरापावेतो रस्ता कॉक्रीट करणे. | २०००००० |
| १२८ | प्र.क्र.2 मध्ये नवीन वसाहत येथे पोलसह पथदिवे बसविणे. | २०००००० |
| १२९ | प्रभाग क्र.०९ विक्रम फुलपगारे यांचे घर ते समाज मंदिर पावेतो रस्ता काँक्रीटीकरण करणे. | २५००००० |
| १३० | प्र.क्र.१० मध्ये श्री.जगन गुरू ते सचिन धनगर यांच्या घरापावेतो रस्ता कॉक्रीट करणे. | २५००००० |
| १३१ | प्रभाग क्र.०९ पाटील गढी, मोठी गढी, साहेबराव फुलपगारे यांच्या घरापावेतो ते विंचु यांच्या घरापावेतो रस्ता काँक्रीटीकरण करणे. | २०००००० |
| १३२ | प्रमोद नगर मध्ये श्री वाणी यांच्या घरापासून ते अविनाश साळुंखे यांच्या घरापर्यंत रस्ता कॉंक्रीट करणे. | २५००००० |
| १३३ | तुळशीराम नगर व भरत नगर भागात अ) श्री. डी.वाय.वाणी ते श्री नेरकर यांच्या घरापर्यंत ब) श्री. ॲड. राहुल भामरे ते लक्ष्मीनारायण अपार्टमेंट क) श्री. मोरे ते पाटील यांच्या घरापर्यंत रस्ता काँक्रीटकरणे. | २०००००० |
| १३४ | सुदर्शन कॉलनी श्री. दिक्षित यांच्या घरापासून ते महाजन यांच्या घरापावेतो रस्ता कॉंक्रीट व बंदिस्त गटार करणे. | २५००००० |
| १३५ | भडकचाळ येथे श्री ब्राह्मणकर यांच्या घरापासून ते भामरे यांच्या घरापर्यंत रस्ता कॉंक्रीट व बंदिस्त गटार करणे. | २५००००० |
| १३६ | प्रभाग क्र.११ रामचंद्र नगर येथे श्री. सरग ते श्री. चौधरी यांच्या घरापर्यंत व परिसरात कॉंक्रीट रस्ता व गटार करणे. | २५००००० |
| १३७ | प्रभाग क्र.११ लक्ष्मी नगर ते श्री. वराडे यांच्या घरापर्यंत व परिसरात कॉंक्रीट रस्ता व गटार करणे. | २५००००० |
| १३८ | प्र.क्र.2 मध्ये हरताळ यांच्या घरापासून ते देवरे यांच्या घर ते कबीर पाठशाळा पावेतो रस्ता डांबरीकरण करणे. | ३०००००० |

उक्त योजनेसाठी मंजूर नियत्यव्यय ३२ कोटी मात्र निश्चित असून कामाची निकड पाहता वरील अ.क्र.१ ते १३९ पर्यंतची सुमारे ३५.४६ कोटीची सर्व प्रभागातील सर्वसमावेशक कामे अत्यावश्यक स्वरूपाची आहेत. त्यासाठी मंजूर नियतव्यया व्यतिरिक्त ३.४६ कोटी मात्र पुर्नविनियोजन (अतिरिक्त) करून निधी उपलब्धतेसाठी प्रशासकीय मान्यता मिळणेस्तव मा.जिल्हाधिकारी धुळे यांच्याकडेस प्रस्ताव सादर करणेस मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**(अमिता दगडे-पाटील)**
**मा.आयुक्त तथा प्रशासक**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-०३ सन २०२३-२४ या आर्थिक वर्षासाठी नागरी दलित वस्ती सुधार योजना अंतर्गत उपलब्ध होणाऱ्या नियतव्ययानुसार कामांची निश्चिती करण्यासाठी आलेल्या कार्यालयीन अहवालावर फेर निर्णय घेणे.

| | |
|---|---|
| म.नगरसचिव | नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले. |
| म.अभियंता | प्रस्ताव मान्यतेबाबत शिफारस आहे. |
| म.अति.आयुक्त | सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे. |
| मा.प्रशासक | सदर प्रस्तावास कार्यालयीन अहवालानुसार प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे. प्रस्ताव तातडीने मा.जिल्हाधिकारी यांच्याकडेस सादर करण्यात यावा. |

**धुळे मनपा महासभा प्रशासक ठराव क्रमांक ०३ दिनांक २५/०१/२०२४**

शासन निर्णयात नमूद निकषानुसार सन २०२३-२४ या आर्थिक वर्षासाठी नागरी दलित वस्ती सुधार योजना अंतर्गत एकूण ५५ कामांची निश्चिती करून ठराव पारित करण्यात आलेला होता. त्यानुसार धुळे महानगरपालिका पत्र क्र./धुमपा/बां.वि./१८१/दि.३१/१०/२०२३ अन्वये ४५ कामांचा एकूण रु.१२,००,००,०००/- मात्र रकमेचा तसेच नव्याने झालेल्या पूरक ठरावानुसार धुळे महानगरपालिका पत्र क्र./धुमपा/बां.वि./११५/ दि.०७/१२/२०२३ अन्वये १० कामांचा एकूण रु.३,६०,००,०००/- मात्र रकमेचा असा एकूण १५,६०,००,०००/- मात्र रकमेचा प्रस्ताव म.जिल्हाधिकारी यांचेकडे सादर केलेला आहे. त्यात प्राधान्य क्रमाने कामे घेणेबाबत निश्चिती नमूद आहे.

उक्तकामी रु.१५.६० कोटी मात्र रकमेचा प्रस्ताव सादर केला असला तरी दीड पट रक्कमेसह मंजूर नियतव्यय नुसार रक्कम रु.८.६५ कोटी मात्र रकमेपर्यंत प्रशासकीय मान्यता मिळण्यास वाव आहे. यामध्ये मा.पालकमंत्री महोदय यांच्या राखीव निधीची कामेने प्राधान्याने घेणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे दि.२०/०१/२०२४ रोजी जिल्हा नियोजन आढावा बैठकीत मा.जिल्हाधिकारी यांनी प्रशासक म्हणून आपण रु.८.६५ कोटी मात्र रकमेची कामांची निश्चिती करून द्यावी असे निर्देश दिले आहे. त्यानुसार शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे. त्यानुसार सदर प्रस्तावास वाचा क्र.१ ते २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

धुळे महानगरपालिका क्षेत्रात नागरी दलित वस्ती सुधार योजना अंतर्गत सन २०२३-२४ या आर्थिक वर्षासाठी खालील कामे निश्चित करून कामे प्रस्तावित करणेस मान्यता देण्यात येत आहे. तात्काळ प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी धुळे यांचेकडेस सादर करावा व पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | प्रभाग ०७ मध्ये सावंत ते शिवाजी हायस्कूल रस्ता करणे | २५००००० |
| २ | प्रभाग ०१ मध्ये वलवाडी भागात रस्ते ,गटार करणे. | ९५००००० |
| ३ | प्रभाग ०१ मध्ये सोलार हायमास्ट बसविणे. | ५०००००० |
| ४ | प्रभाग ०४ मध्ये राजेंद्र छात्रालया पसून ते भावसार बेकरी पर्यंत रस्ता करणे. | २५००००० |
| ५ | प्रभाग ०७ विजय मराठे ते फिरोज पठाण घरा पर्यंत रस्ता व गटार करणे. | २५००००० |
| ६ | प्रभाग ०१ मध्ये विविध ठिकाणी लाईट, पोल लावणे. | २५००००० |
| ७ | दैठनकर नगर मध्ये रस्ते व गटार करणे. | ३५००००० |
| ८ | प्रभाग १० मध्ये सफाई कर्मचारी म्युनिसिपल कॉलनी येथे रस्ता करणे. | २०००००० |
| ९ | चंदन नगर व विविध ठिकाणी सार्वजनिक शौचालय बांधणे. | २५००००० |
| १० | विष्णू नगर व विविध ठिकाणी सार्वजनिक शौचालय बांधणे. | २५००००० |
| ११ | पंचवटि नदि किनारी व विविध ठिकाणी सार्वजनिक शौचालय बांधणे. | २५००००० |

| | | |
|---|---|---|
| १२ | सुशी नाला येथील भागात सार्वजनिक शौचालय बांधणे. | २५०००००० |
| १३ | प्रभाग क्रमांक १ मध्ये गोंदूर रोड चिकन सेंटरपासून सुशी नाल्यापावेतो व विविध ठिकाणी रस्ता कॉक्रीट करणे. | ३०००००० |
| १४ | प्र.क्र.१ मध्ये अक्षय कॉलनी मध्ये विविध ठिकाणी रस्ता कॉक्रीट करणे. | ३०००००० |
| १५ | प्र.क्र.४ मध्ये भोलानाथा बरेलीकर यांच्या घरापासून ते वसंत माळी यांच्या घरापावेतो रस्ता कॉक्रीट करणे. | २०००००० |
| १६ | प्र.क्र.४ मध्ये भालचंद्र वाणी यांच्या घरापासून ते बलराम यादव यांच्या घरापावेतो रस्ता कॉक्रीट करणे. | १५००००० |
| १७ | प्र.क्र.४ मध्ये दिलीप कराड यांच्या घरापासून स्टेडियम पावेतो रस्ता कॉक्रीट करणे. | २५००००० |
| १८ | पवार यांचे घरापासून ते येवले यांच्या घरापावेतो रस्ता कॉक्रीट करणे. | १५००००० |
| १९ | सुर्यवंशी यांच्या घरापासून ते काळे यांच्या घरापावेतो रस्ता कॉक्रीट करणे. | १५००००० |
| २० | वाडीले यांच्या घरापासून ते श्रीराम मंदिरापावेतो रस्ता कॉक्रीट करणे. | १५००००० |
| २१ | भोईवाडा पंचायत भवन ते वाडीले किराणापावेतो रस्ता कॉक्रीट करणे. | २०००००० |
| २२ | नेहरू पुतळयापासून ते मोतीनाल्या पावेतो बंदिस्त गटार करणे. | २५००००० |
| २३ | प्र.क्र.१५ मध्ये समर्थ नगर मधील इंगळे यांच्या घरापासून ते आडखमोल यांच्या घरापावेतो रस्ता कॉक्रीट करणे. | ३०००००० |
| २४ | प्र.क्र.१५ मध्ये एकता नगर मधील बैसाणे यांच्या घरापासून ते निकुंभे यांच्या घरापावेतो रस्ता कॉक्रीट करणे. | ३०००००० |
| २५ | प्र.क्र.१६ मध्ये राजरत्न हौसिंग सोसायटी ओपनस्पेसला लागून व सत्यसाईबाबा सोसायटी अंतर्गत रस्ते कॉक्रीट करणे. | ६०००००० |
| २६ | जयशंकर कॉलनी येथे रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. | २०००००० |
| २७ | राजु परदेशी ते जुम्मन ते मरसाळे यांच्या घरापर्यंत रस्ता कॉंक्रीट व पाईप गटार करणे | १०००००० |
| २८ | मोहाडी खालचे गाव गावठाण गुलाब भाऊ नगर व  सातभाई नगर येथील अंतर्गत रस्ता कॉंक्रीट करणे. | ३०००००० |
| २९ | प्र.क्र.१५ मध्ये नवजीवन नगर आणि नारायण मास्तर चाळ येथे रस्ता कॉक्रीट करणे. | ५०००००० |
| ३० | प्रभाग क्र.१० मध्ये गायकवाड चौक ते उत्तरेस ग.नं. १४ महेतर समाज सफाई कामगार मनपा कर्मचारी वसाहत पर्यंत रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. | ५०००००० |

**सही/- x x x**
**(अमिता दगडे-पाटील)**
**मा.आयुक्त तथा प्रशासक**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-०४ — सन २०२३-२४ या आर्थिक वर्षांसाठी नागरी दलितेत्तर सुधार योजना अंतर्गत अंतर्गत उपलब्ध होणाऱ्या नियतव्ययानुसार कामांची निश्चिती करण्यासाठी आलेल्या कार्यालयीन अहवालावर फेर निर्णय घेणे.

म.नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म.अभियंता — प्रस्ताव मान्यतेबाबत शिफारस आहे.

म.अति.आयुक्त — सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

मा.प्रशासक — सदर प्रस्तावास कार्यालयीन अहवालानुसार प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे. प्रस्ताव तातडीने मा.जिल्हाधिकारी यांच्याकडेस सादर करण्यात यावा.

**धुळे मनपा महासभा प्रशासक ठराव क्रमांक ०४ दिनांक २५/०१/२०२४**

शासन निर्णयात नमूद निकषानुसार सन २०२३-२४ या आर्थिक वर्षासाठी नागरी दलितेत्तर सुधार योजना अंतर्गत एकूण ४४ कामांची निश्चिती करून ठराव पारित करण्यात आलेला होता. त्यानुसार धुळे महानगरपालिका पत्र क्र./धुमपा/बां.वि./१८२/ दि.३१/१०/२०२३ अन्वये ३२ कामांचा एकूण रु.११,७९,२१,३३५/- मात्र रकमेचा तसेच नव्याने झालेल्या पूरक ठरावानुसार धुळे महानगरपालिका पत्र क्र./धुमपा/बां.वि./२१६/ दि. ०७/१२/२०२३ अन्वये १२ कामांचा एकूण रु.३,०९,००,०००/- मात्र रकमेचा असा एकूण १४,८८,२१,३३५/- मात्र रकमेचा प्रस्ताव म.जिल्हाधिकारी यांचेकडे सादर केलेला होता. त्यात प्राधान्य क्रमाने कामे घेणेबाबत नमूद आहे.

उक्तकामी रु.१४.८८ कोटी मात्र रकमेचा प्रस्ताव सादर केला असला तरी दीड पट रक्कमेसह मंजूर नियतव्यय नुसार रक्कम रु.८.५४ कोटी मात्र रकमेपर्यंत प्रशासकीय मान्यता मिळण्यास वाव आहे. यामध्ये मा.पालकमंत्री महोदय यांच्या राखीव निधीची कामे प्राधान्याने घेणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे दि.२०/०१/२०२४ रोजी जिल्हा नियोजन आढावा बैठकीत मा.जिल्हाधिकारी यांनी प्रशासक म्हणून आपण रु.८.५४ कोटी मात्र रकमेची कामांची निश्चिती करून द्यावी असे निर्देश दिले आहे. त्यानुसार शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे. त्यानुसार सदर प्रस्तावास वाचा क्र.१ ते २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

उक्त प्रस्तावानुसार धुळे महानगरपालिका क्षेत्रात नागरी दलितेत्तर सुधार योजना अंतर्गत सन २०२३-२४ या आर्थिक वर्षांसाठी खालील कामे निश्चित करून कामे प्रस्तावित करणेस मान्यता देण्यात येत आहे. तात्काळ प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी धुळे यांचेकडेस सादर करावा व पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | बंजार गल्ली अनिल गायकवाड यांच्या घराजवळ रस्ता व गटार कॉंक्रीट करणे. | २५००००० |
| २ | जय जवान चौक गल्ली न.५ ते बाल गोपाल मित्र मंडळ पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | २५००००० |
| ३ | प्रभाग क्र. 16 मध्ये जलगंगा सोसायटी अंतर्गत रस्ते व गटार करणे. | २५००००० |
| ४ | पवन मारोती मित्र मंडळ गल्ली न- ५/६ ते जय बजरंग चौक रस्ता कॉंक्रीट करणे. | २०००००० |
| ५ | नवभारत चौक ते माधव पुरा चौक गल्ली न.६ पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | २२००००० |
| ६ | प्रभाग क्र. १ मध्ये बलवाडी व इतर भागात लाईट पोल व हायमॅक्स लावणे. | ३०००००० |
| ७ | प्रभाग क्र ५ मध्ये अंतर्गत रस्ता कॉंक्रीट करणे . | ३०००००० |
| ८ | स्टेशन रोड ते सुरत वाला बिल्डींग पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | २५००००० |
| ९ | रेल्वे स्टेशन ते कोर्ट पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | ४५००००० |
| १० | प्रभाग क्रमांक 2 मध्ये डॉ महाजन यांच्या घर आणि दवाखाण्याजवळ रस्ता डांबरीकरण करणे. | ३२००००० |

| | | |
|---|---|---|
| ११ | परिमल कॉलनी येथे स्वप्नशिल्प अपार्टमेंट ते अग्नीहोत्री यांच्या घरापर्यंत व निरेन व्यास ते भंडारी हॉल, मोराणकर ते सुभाष घावणे रस्ता कॉंक्रीटीकरण करणे . | ३०००००० |
| १२ | श्री.सावंत यांच्या घरापासून ते श्री.व्ही.डी.पाटील यांच्या घरापर्यंत रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. | २४९२०९७ |
| १३ | श्री. जयवंत वाघ यांच्या घरापासून ते गणपती पुला पर्यंत रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. | २४९८४९३ |
| १४ | विजय कुलकर्णी -ते सावंत यांच्या घरापर्यंत रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. | २४९५८६७ |
| १५ | प्रशांत बोरसे ते सरला निकम व यशोधा कांडप चक्की ते प्रशांत वाणी, समृध्दी अपार्टमेंट ते राजु वाणी यांच्या घरापर्यंत रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. | २४९८९३७ |
| १६ | वलवाडी येथील अमरधाम (समशानभूमी) विकसीत करणे | ५०००००० |
| १७ | कुमार नगर अमरधाम विकसित करणे | ५०००००० |
| १८ | म्युनिसिपल कॉलनी भागातील अंतर्गत रस्ते कॉंक्रीटीकरण करणे. | २४९६१०३ |
| १९ | मिलिंद बोरसे ते धैर्यशील पाटील यांच्या घरापावेतो बंदिस्त गटार करणे. | २४९४३६६ |
| २० | मिल परिसर अमरधाम विकसित करणे | ५०००००० |
| २१ | गोपाळ नगर पासून ते मुख्य वनरक्षक यांच्या निवासस्थाना पावेतो रस्ता डांबरीकरण करणे. | ६०००००० |
| २२ | प्रभाग क्र.५ मध्ये अनमोल नगर शिवप्रताप कॉलनी भागात रस्ते कॉंक्रीटीकरण करणे. | ४९९५५९८ |
| २३ | प्रभाग क्र.१७ मध्ये श्रीकृष्ण कॉलनी वॉल कंपाऊंड येथे शेड उभारणे. | ३०००००० |
| २४ | प्रभाग क्र.३ राजेश्वर नगर भागात श्री. अजय मराठे ते डॉ. कोठावदे ते अजित गिडगे यांच्या घरापावेतो रस्ता डांबरीकरण करणे. | २५००००० |
| २५ | प्र.क्र.4 मध्ये विनोद मोराणकर यांच्या घरापासून ते रसवंती पावेतो(गणपती पुलाजवळील) रस्ता डांबरीकरण करणे. | ३०००००० |
| २६ | प्र.क्र.5 मध्ये इंद्रप्रस्थ कॉलनी बोर्ड जवळील प्रा. श्री.पाटील यांच्या घरापासून मोहन कॉम्प्लेक्स पावेतो रस्ता डांबरीकरण करणे. | ५०००००० |

**सही/- x x x**
**(अमिता दगडे-पाटील)**
**मा.आयुक्त तथा प्रशासक**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-०५ धुळे महानगरपालिका परवाना शुल्क सुधारित वार्षिक दरपत्रक व उपविधी प्रस्ताव शासनाकडे सादर करणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म.बाजार विभाग प्रमुख परवाना शुल्काचे सुधारित दरपत्रक तयार केले होते. उपविधी मंजूर नव्हते. ती उपविधी पण आपण महासभेपुढे ठराव नं. ३६० दि ८/११/२०२३ रोजी वर्तमान पत्रात प्रसिध्दीसाठी मंजूरी मिळाली होती. त्यानंतर दोन वर्तमान पत्रात जाहिर प्रसिध्दी केली. मनपात सुध्दा बोर्डावर पण नोटीस लावली होती. काही आक्षेप घेण्यासाठी मुदतीत एकही आक्षेप आलेला नाही. आता महासभेच्या अंतिम मंजूरीने प्रस्ताव शासनाकडे पाठवायचा आहे. शहरातील व्यापाऱ्यांची कॅपीसिटी नुसार तयार करण्यात आले आहे. प्रस्ताव मान्यतेस्तव शिफारस करण्यात येत आहे.

मा.प्रशासक — कार्यालयीन अहवालानुसार प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे. तात्काळ शासन मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करावा.

**धुळे मनपा महासभा प्रशासक ठराव क्रमांक ०५ दिनांक २५/०१/२०२४**

धुळे महानगरपालिका परवाना शुल्क सुधारित दरपत्रक व उपविधी हरकत किंवा आक्षेप घेणेबाबत जाहिर प्रसिध्दी देणेबाबत म.न.पा. ठराव क्र. ३०७ दि. ०८/११/२०२३ नुसार मंजुरी दिली आहे त्यानुसार दि. २५/११/२०२३ रोजीच्या दै. आपला महाराष्ट्र व दै. पुण्यनगरी या वर्तमानपत्रात जाहिर प्रकटन प्रसिध्दी देण्यांत आलेली आहे तसेच म.न.पा. नोटीस बोर्डावर देखील जाहिर प्रकटन प्रसिध्दी करीता लावण्यांत आले मात्र यावर मुदतीत ३० दिवसा पर्यत कोणीही आक्षेप तथा हरकत घेतल्या नाही.त्यानुसार परवाना विभागाकडून प्रस्ताव सादर झालेला आहे. त्यानुसार सदर प्रस्तावास वाचा क्र.१ ते २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

उक्त प्रस्तावानुसार धुळे महानगरपालिका परवाना शुल्क सुधारित वार्षिक दरपत्रक व उपविधी प्रस्ताव शासनाकडे सादर करणेस मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**(अमिता दगडे-पाटील)**
**मा.आयुक्त तथा प्रशासक**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-०६ — महाराष्ट्र महानगरपालिका व जाहिरात प्रदर्शित नियमन व नियंत्रण नियम, २०२२ नुसार जाहिरातीसाठी जागेची वर्गवारी निश्चित करुन, सुधारीत जाहिरात परवाना शुल्क आकारणी करणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर फेर विचार करणे.

म.नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म.उपायुक्त — महाराष्ट्र मनपा जाहिरात प्रदर्शित करण्याचे नियमन आणि नियंत्रण नियम २०२२ ९ मे २०२२ नुसार नविन पॉलिसी आली आहे. याप्रमाणे आपण जागा निश्चीती करुन जाहिरात परवाना दर निश्चीत करुन सादर केले आहे. यापूर्वी मार्च मध्ये सादर केला होता प्रस्ताव तो तहकूब ठेवला होता. त्यानंतर ही पुन्हा सादर केला तेव्हा पुन्हा तहकूब ठेवला होता. जागेची वर्गवारी करणे आवश्यक असल्याने प्रस्ताव पुन्हा महासभेपुढे सादर केला आहे.

म.आयुक्त — आपण २-३ गोष्टी काय करतोय प्रॉमिनंट ते सांगावे. अल्पमुदतीची जाहिरातीचे दर आहे त्या संर्दभात आणि ठिकाणच्या संदर्भात PIL क्र.११५/२०११ जे अधिसूचना आहे. त्याच्या अनुषंगाने कुठल्या एरियात नो डिजीटल झोन केले, कुठल्या एरियामध्ये लावण्यासाठी परवानगी देत आहात ते सांगावे. मग आपण होर्डीग संदर्भात काय करतो त्यावर सांगता येईल.

म.उपायुक्त — आपण प्रतिबंधीत क्षेत्र दिले आहे मनपा नविन प्रशासकीय इमारत १०० मी. , मनपा जुनी प्रशासकीय इमारत १०० मी, शहरातील महापुरुष यांचे स्मारक १०० मी., शहरातील मंदिर, मस्जिद, गुरुद्वारा, चर्च इतर धार्मिक स्थळे १०० मी., कराची वाला खुंट, बॉम्बे लॉज चौक १०० मी, कालिका माता चौक, पांझरा नदी किनारी १०० मी, जुने सिव्हील हॉस्पिटल व बाफना हायस्कूल चौक १०० मी या ठिकाणी बॅनर पोस्टर्स, होर्डीग स्टीकर्स लावण्यास प्रतिबंधीत केले आहे. आणि नदी पात्रातले आहेत नाल्यातील ते निष्कासित करायला परवानगी मागतोय.

म.आयुक्त — आता आपल्याकडे एक्झीस्टींग पण होर्डींग आहेत. त्याची परिस्थिती काय ? त्यांच्या परमिशन कधी पर्यंत घेतल्या आहे? कितीला परवानगी आहे अजून आणि कितीला नाही?

म. उपायुक्त — २२२ ठिकाणे आहेत त्या व्यतिरिक्त निष्कासित करायला परवानगी घेतोय. त्यांचे नावे दिले आहे यादी मध्ये.

म.आयुक्त — होर्डींग असोसिएशनचा मुद्दा होता की, आम्ही जीएसटी भरतो तुम्ही जीएसटी शुल्क लावू नये. त्यामुळे मागील ठराव तहकूब ठेवला होता. आता परवाना नसेल तर त्यांच्या जीएसटी चा विषय उपस्थित होतो. किती परवाने लाईव्ह आहे? किती परवान्यांबाबत आपण काय काय केले?

म. माईनकर — आपण २२२ ठिकाणी परवानगी यापूर्वी दिली होती. त्यांची मुदत संपली आहे. आपण त्यांच्याकडे मागणी केली त्यांचे म्हणने आहे जाहिरात कर देणार नाही. फक्त जागा भाडे देऊ.

म.आयुक्त — जाहिरात कर ॲबोलिश झाला त्या बद्दल बोलत नाही. २०२२ ची जी पॉलिसी आहे नव्याने जाहिरात परवाने शुल्क ठरावायचे आहे. जागा ठरवायच्या आहे. प्रतिबंधीत जागा ठरावायचे आहे. शुल्क काय असावे यासाठीचा हा विषय आहे. म्हणून ज्यांच्या मुदती संपल्या असतील आजच्या घडीला त्यांचे परवाना शुल्क ठरवून घ्यावे लागेल. शुल्क भरतांना काय काय घेतो आपण ? त्याचे रेट काय प्रस्तावित केले ते सांगा.

म. माईनकर — इलेक्ट्रॉनिक जाहिरात साठी २२ रु चौ.फुट पूर्वी २० रुपये होते १० % नैसर्गिक वाढ करुन २२ केले आहे, वॉलपेंटींगसाठी ६ रु चौ.फुट केला, होर्डींगसाठी जागा भाडे ९०० रुपये केले आहे. यापूर्वी याचे ६००रुपये होते. २२२ जागा निश्चीत केल्या आहे. या व्यतिरिक्त ४०० ते ५०० होर्डींग शहरात लागले आहे. त्यापैंकी २२२ हे आपल्याकडे परवाना घेतात.

म.आयुक्त — होर्डींग असोसिएशनच पत्र आपल्याला विचारात घ्यावयाचे आहे. त्यानुसार प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा महासभा प्रशासक ठराव क्रमांक ०६ दिनांक २५/०१/२०२४**

महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण भाग १-अ-मध्य उप- विभाग, नगरविकास विभाग दिनांक ०९ मे २०२२ रोजी अधिसूचनेव्दारे, महानगरपालिका क्षेत्रातील आकाश-चिन्हे आणि जाहिरात प्रदर्शनाचे नियमन व नियंत्रण करणारे नियम करण्यात आलेले असून, या नियमांना “महाराष्ट्र महानगरपालिका (आकाश- चिन्हे (स्काय-साईन) व जाहिरात प्रदर्शित करण्याचे नियमन आणि नियंत्रण) नियम, २०२२” असे संबोधण्यात आलेले आहेत.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम,१९४९ कलम ३८६ (२) अन्वये, प्रत्येक परवाने किंवा लेखी परवानगीसाठी आयुक्त, महानगरपालिकेच्या मंजुरीने वेळोवेळी ठरवील अशा दराने फी आकारता येते. धुळे महानगरपालिका क्षेत्रातील खाजगी व शासकीय जागांमध्ये जाहिरात परवानाकरीता “परवाना शुल्क” आकारणी करणेबाबत मे. स्थायी समिती ठराव क्र.६३ दिनांक:१९/९/२०१५ अन्वये सदर बाब ही दरवाढविणेचा अधिकार मे. महासभेस असल्यामुळे धोरणात्मक निर्णय घेणेसाठी महासभेपुढे सादर करावा असा ठराव पारीत झालेला आहे.

त्यानुसार सदरचा विषय प्रशासना मार्फत महासभेपुढे सादर करण्यात आला असता महानगरपालिका ठराव क्रमांक २१० दिनांक २९/०३/२०२३ व महानगरपालिका ठराव क्रमांक ३४७ दि १९/१२/२०२३ अन्वये सदरचा विषय तहकूब ठेवण्यात आलेला आहे.

याबाबतचे उच्च न्यायालयाचे निर्देश असल्याने सदर प्रस्तावाची कार्यवाही हि तातडीने करणे आवश्यक आहे. त्यानुसार सदर प्रस्ताव मे. महासभेपुढे सादर करण्यात आलेला आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका १९४९ चे कलम ४५६ अ च्या पोट कलम (१) यासह आणि कलम २४४, २४५ व्दारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून धुळे महानगरपालिकेच्या क्षेत्रात व्यवसाय व बांधकामामध्ये मोठया प्रमाणात होणारी वाढ व त्यानुसार जाहिरात क्षेत्रापासुन मिळणारे उत्पन्न विचारात घेता धुळे महानगरपालिकेस परवाना शुल्कात दर ३ वर्षांनंतर वाढीव सुधारणा करणे आवश्यक आहे.

तरी सद्य स्थितीत धुळे महानगरपालिका ठराव नंबर २२० दिनांक:११/२/२०१६ च्या मान्यते नुसार अल्पमुदतीसाठी व दिर्घ मुदतीसाठी असलेल्या जाहिरात फलकांवर भाग निहाय जाहिरात कर आकारण्यात येत होता.

तसेच सदर “अ” आणि “ब” वर्गवारी नुसार सन २०१६ चे ठराव प्रमाणे दर मंजुरीनुसार नैसर्गिक वाढ अंदाजे १०% सुचविण्यात आलेली होती. याबाबत वस्तूस्थिती लक्षात घेवून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम,१९४९ कलम २४४,२४५ ३८६ (१),(२) अंतर्गत, खालील प्रमाणे जाहिरात परवाना शुल्क वसूल करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**अल्प मुदतीसाठी जाहिरात परवाना शुल्क**

| **अ.क्र.** | **भाग निहाय वर्गवारी** | **भागाचे नांव** | **महासभेने मान्य केलेले दर ₹.** |
|---|---|---|---|
| १ | अ | पारोळा कॉटन मार्केट ते झाशी राणी पुतळा तसेच राजवाडे बँक ते नेहरू पुतळ्या पावेतो, नगांवबारी ते दसेरा मैदान चौक, आग्रारोड शिवाजी पुतळा ते लोकमान्य हॉस्पीटल पावेतो तसेच नेहरू चौक ते पंचायत समिती पावेतो, राजवाडे बँक ते श्रीराम पेट्रोल पंप, संपूर्ण जेलरोड तसेच एस.टी.स्टँड, स्वस्तीक टॉकीज ते फुलवाला चौक व पांझरा नदी किनारी. | ₹४/- चौ. फुट प्रति दिवस<br><br>अनामत ₹७००/- (मनपा जागेवर) |
| २ | ब | ध्वज (झेंडे),फुगे, तात्पुरत्या स्वरूपाच्या कमानी, सर्व प्रकारचे फिरते /स्थिर वाहन, डिजिटल बोर्ड, एलइडी,एलसीडी, इलेक्ट्रोनिक डिस्प्ले तसेच इतर कुठल्याही प्रकारच्या जाहिरात | |
| | | रिक्षा/ चार चाकी वाहनावरील/ इतर वाहनावरील/ आवाज /अनाउन्सिंग/इतर कुठलाही प्रकारची जाहिरात | ५००/-प्रति दिवस |
| ३ | क | शहराचा उर्वरीत सर्व भाग | ₹३/- चौ.फुट प्रति दिवस अनामत ₹५००/- (मनपा जागेवर) |

**दिर्घ मुदतीसाठी जाहिरात परवाना शुल्क**

| **अ.क्र.** | **जाहिरातीचा प्रकार** | **महासभेने मान्य केलेले दर** |
|---|---|---|
| १ | रोषनाई केलेल्या किंवा इलेक्ट्रानिक जाहिरात | ₹२०/- प्रति चौ.फुट |
| २ | वॉल पेंटींग, संरक्षक कठडे, वृक्ष संरक्षण जाळ्यावरील (झाडावर अथवा झाडाच्या फांदीवर वगळून)<br>(मनपाची जागा असल्यास अनामत) | ₹५/- प्रति चौ.फुट<br><br>अनामत ₹५००/- |
| ३ | i. होर्डींग्ज बोर्ड | ₹२२/- चौ.फुट प्रति वर्ष |
| | ii. जागा भाडे | ₹९००/- प्रती वर्ष |

| | | |
|---|---|---|
| | iii. अनामत रक्क्म (मनपा जागेवर) | सुधारीत जाहिरात दराच्या दोन पटीने प्रति बोर्ड |
| ४ | जाहिरात शुल्क परवानगी अर्ज | ₹५००/- |
| | नुतनीकरण अर्ज | |
| ५ | उभे व कट आऊट बोर्डसाठी | ₹३/- चौ.फुट प्रति दिवस |

तसेच **PIL** क्र. १५५/२०११ व महाराष्ट्र शासन राजपत्र नगर विकास विभाग अधिसूचना दि. ९ मे २०२२ मधील सूचनेनुसार शहराची तपासणी करून सुधारित जागा निश्चित करण्यात आलेल्या आहेत त्या सदरच्या प्रस्तावात नमूद परिशिष्ट अ मध्ये अल्प मुदतीसाठी अ.क्र. १ ते ९ तसेच परिशिष्ट ब मधील अ.क्र.१ ची जागा तसेच दिर्घ मुदतीसाठी अ.क्र. १ ते २२२ जागा निश्चित करणेस मान्यता देण्यात येत आहे. याव्यतिरिक्त विशिष्ट ठिकाणी मा. आयुक्त सो व मा. नगररचनाकर यांच्या मान्यतेने तात्पुरती जागा निश्चित करण्याचे / रद्द करण्याचे अधिकार प्रदान करण्यात येत आहेत.

तसेच शहरातील विशिष्ट ठिकाणी हरकती येत असल्याने खालील ठिकाणी बॅनर पोस्टर्स होर्डींग स्टिकर्स हे लावण्यास प्रतिबंध करणेस मान्यता देण्यात येत आहे.

**परिशिष्ट क**

| अ.क्र | जागेचा तपशील | अंतर |
|---|---|---|
| १ | मनपा नविन प्रशासकीय इमारत | १०० मीटर |
| २ | मनपा जुनी प्रशासकीय इमारत | १०० मीटर |
| ३ | शहरातील महापुरुष यांचे स्मारक / पुतळे | १०० मीटर |
| ४ | शहर हद्दीतील मंदिर, मस्जिद, गुरुद्वारा. चर्च, इतर धार्मिक स्थळे | १०० मीटर |
| ५ | कराचीवाला खुंट, बॉम्बे लॉज चौक | १०० मीटर |
| ६ | कालिका माता मंदिर चौक, पांझरा नदी किनारी | १०० मीटर |
| ७ | जुने सिव्हील हॉस्पिटल, बाफना हायस्कूल चौक | १०० मीटर |

तरी दीर्घ मुदतीचे जागा २२२ निश्चित करण्यात येत असून इतर ठिकाणी बेकायदेशीर रित्या होर्डिंग लावण्यात आलेल्या आहेत व त्या होर्डिंगचे कुठल्याही प्रकारचे शुल्क जाहिरातदार भरत नसल्याने सदरच्या होर्डिंग निष्कासित करण्यात याव्या. तसेच नाल्यामधील व नदीपात्रातील होर्डिंगस प्राधान्याने काढण्यास मान्यता देण्यात येत आहे .

सदरच्या शहरातील बेकायदेशीर तात्पुरत्या स्वरूपाचे बॅनर्स व दीर्घ मुदतीचे बेकायदेशीर लावण्यात आलेले होर्डीग्स तात्काळ अतिक्रमण विभागाने काढण्याची कार्यवाही करावी व यापुढे असे बेकायदेशीर बॅनर्स व होर्डीग्स हे सुद्धा लागणार नाही याची दक्षता घ्यावी व बेकायदेशीर बॅनर्स, होर्डिंग लागल्यास ते तात्काळ अतिक्रमण विभागाने काढण्यात यावे असे अतिक्रमण विभागास आदेशित करण्यात येत आहे. परिशिष्ट क मधील जागांना बॅनर, पोस्टर्स, होर्डींग, स्टिकर्स हे लावण्यास प्रतिबंध करण्यात येत आहे. त्यानुसार सदर ठिकाणी पोस्टर, बॅनर, होर्डिंग लावल्यास त्यावर महाराष्ट्र मालमत्तेच्या विरुपणास प्रतिबंध करणे करिता अधिनियम १९९५ अन्वये कायदेशीर गुन्हा दाखल करण्यात येईल. त्याअनुषंगाने कायदेशीर कार्यवाही करण्यात मान्यता देण्यात येत आहेत. तसेच महाराष्ट्र शासन अधिसूचना दिनांक ९ मे २०२२ नुसार असलेल्या सर्व नियमांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम २४४,२४५, व ३८६ नुसार व महाराष्ट्र महानगरपालिका आकाश चिन्हे (स्काय साईन) व जाहिरात प्रदर्शित करण्याचे नियमन व नियंत्रण नियम २०२२ अन्वये दि. ९ मे २०२२ पासून सुधारित जाहिरात परवाना शुल्क वसूल करण्यास तसेच प्रस्तावात नमूद परिशिष्ट अ व ब प्रमाणे अल्प मुदतीच्या व दिर्घ मुदतीच्या जागा निश्चित करणेस मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**(अमिता दगडे-पाटील)**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

**मा.आयुक्त तथा प्रशासक यांच्या आदेशाने राष्ट्रगीत गायनानंतर बैठक समाप्त झाली.**

**सही/- x x x**
**(अमिता दगडे-पाटील)**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**